E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# शेतकरी प्रश्न आणि महाराष्ट्र परिषद

**प्रा. नागवे कृष्णा अण्णासाहेब**

सहायक प्राध्यापक,

इतिहास विभाग,

मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड, जि. जालना.

ई-मेल: kanagwe@gmail.com

**सारांश (Abstract):**

अन्यायाच्या विरोधात केलेले आंदोलन किंवा चळवळ ही एखाद्या कारणाने प्रेरित नसून अनेक कारणे सदरील घटनेच्या पाठीमागे असतात. हैद्राबाद राज्य निजामाच्या सरंजामी संरचनेमुळे प्रभावित असल्याने सामान्य माणसाने स्वातंत्र्याच्या विचाराने प्रभावित होणे निजाम सरकारला आवडणे शक्य नव्हते. शेतकरी एखाद्या चळवळीला सुरुवातीला पाठिंबा देत नव्हते; पण आपल्यावर अन्याय होतो आणि त्याचा प्रतिकार हा फक्त शश्त्राने नव्हे तर विचाराने होऊ शकते हे महाराष्ट्र परिषदेच्या विविध अधिवेशनातून शेतकरी समूहाला कळले होते. निजाम सरकार अशी संमेलने चिरडून टाकत असतांना शेतकरी मात्र अधिवेशनास का हजर राहू लागले? यामागे अनेक बाबी होत्या. शेतकरी आपल्या हिताप्रती जागृत झाला होता. सरंजामी अन्यायाच्या पाठीमागे निजाम सरकार आहे आणि त्यांना प्रतिरोध केल्याशिवाय शेतकरी हिताचे निर्णय होणे शक्य नाही असे शेतकरी लोकांना वाटल्याने त्यांनी महाराष्ट्र परिषदेची अधिवेशने गाठली व त्यातील त्यातील नेत्याची भाषणे ऐकली. सदरील अधिवेशनात शेतकरी प्रश्नाची चर्चा अधिक विस्ताराने होऊन शेत आणि शेतकरी यांच्या हिताचे मुद्दे देखील मांडण्यात आले. यातून शेतकरी समाज जागृत झाला आणि त्याला निजामी शासनाचा अन्याय समजून घेता आला. अशारीतीने सहभागातून शेतकरी असंतोष दिसून आला.

**मुख्य शब्द:** शेतकरी, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, शेतकरी असंतोष, महाराष्ट्र परिषद

महाराष्ट्र परिषद निजामकाळात सामान्य माणसाचा आधार होती. सभेचे आयोजन आणि विचारांची देवाणघेवाण तत्कालीन सातव्या निजामाच्या विरोधी शेतकरी समूह जागृतीचे माध्यम ठरला होता. निजाम अशी अधिवेशने होऊ नये ही मानसिकता ठेवत आणि संमेलनावर बंधने लाडात होता. अधिवेशनातून कष्टकरी, शेतकरी व सामान्य माणसांच्या जीवनातील आणि राजकीय सत्तेच्या अन्यायी स्वरूपाविषयी जागृती महाराष्ट्र परिषद करत होती. शेतकरी समाज हा कोणत्याही ग्रामीण

अर्थव्यवस्थेचा नई सत्ता स्थिरतेचा महत्वपूर्ण घटक असतो याची जाणीव परिषदेला असल्याने शेतकऱ्यांचे विषय मांडणे महाराष्ट्र परिषदेला आवश्यक वाटत होते.

## अध्यक्षीय भाषणे आणि शेतकरी मार्गदर्शन:

अध्यक्षीय भाषणात शेती, शेतकऱ्याच्या समस्या आणि त्यावर उपाय कोणते आहेत याची चर्चा करण्यात आली. सहकारी पतपेढया, बँका आणि सेंट्रल बँक इत्यादीचा लाभ गरीब शेतकऱ्याना व्हावा ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. एखाद्या शेतकरी व्यक्तीला अधिवेशनात स्थान देण्याचा अर्थ असा होता की ग्रामीण समाज हा जनआंदोलानात सहभागी झाला पाहिजे. हैद्राबाद राज्यातील ग्रामीण समाज एकत्र आला तरच ही सरंजामी निजामी व्यवस्था डळमळू शकते याची जाणीव स्वातंत्र्य सैनिक आणि अधिवेशनातील नेत्यांना होता. या अधिवेशनात नानल यांच्या भाषणाचा अर्थ समजून घेतला की, शेतकरी प्रश्नावर महाराष्ट्र परिषदेचे लक्ष असल्याचे जाणवते. अधिवेशनात शेतकरी वर्गाचे प्रश्न आणि मराठवाडा विभागातील कमी असलेले जलसिंचन यांच्याकडे लक्ष वेधण्यात आले होते. त्याचप्रमाणे शेतीच्या सुधारणा कशा आवश्यक आहे यांची देखील माहिती अध्यक्षीय भाषणातून मांडण्यात आली होती. हा एक प्रकारचा शेतकरी असंतोष व्यक्त करण्याचा मार्ग होता. ज्याच्या माध्यमातून शेतकरी निजामी अन्याय सहज समजू शकला आणि मराठवाडा मुक्तिसंग्रामाची पार्श्वभूमी तयार होऊ शकली.

## सरंजामशाही आणि शेतकरी प्रश्न:

सत्ताधारी सरंजामी संरचना यामुळे सत्तेची एक उतरंड तयार झाली होती. ज्यामध्ये निजामापासून ग्रामीण पातळीपर्यंत एक संरचना निर्माण झाली होती आणि शेतकरी शोषणाची ही रचना निजामी सत्तेचे कवच बनली होती. निजामकाळात खालसा जिल्हयात आणि जहागीरी क्षेत्रातील महसूलाच्या प्रमाणात विभिन्नता आढळते. निजामकाळात जी गावे, तालुके जहागिरी अंतर्गत होती त्यांना जागीरदाराच्या शोषणाचा बळी होणे नित्याचेच होते. त्यामुळे महाराष्ट्र परिषदेच्या प्रथम अधिवेशनात खालसा इलाख्याइतकाच जमीन महसूल वसूल करण्यात यावा आणि प्रचलित करप्रणाली अयोग्य व जाचक असल्याने रद्द करण्यात यावी ही मागणी मांडण्यात आली होती.

अनेक जहागीरींपैकी पायगा हा एक जहागीरीचा प्रकार होता. पायगा जहागीर ही निजामाचे रक्षण करणाऱ्याना देण्यात येत होती. जहागीरदार आपल्या जहागिरीच्या समस्या जाणून घेण्याऐवजी महसूल मिळाला तर खूप झाले ह्या भूमिकेत असायचा. नेहमी निजाम शासन त्यांच्या सोबत असल्याने आणि आणि विश्वासू असल्याने तक्रार करण्यास शेतकरी धजावत नव्हते. मात्र महाराष्ट्र परिषदेच्या

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

व्यासपीठ मिळाल्याने शेतकरी लोकांचे हाल आणि हलापेष्ठा मांडण्याचे कार्य करण्यात आले होते. महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशचा प्रमुख जनाधार शेतकरी वर्ग होता. शेतकरी समाजापर्यंत पोहचल्याशिवाय आंदोलन उभे राहणार नव्हते. "शामराव पाटील येलवटकरांनी संस्थानातील पायगा भागातील शेतकऱ्याचे कसे हाल होत होते ही बाब मांडली होती."[1]

महाराष्ट्र परिषदेने शेतकरी लोकांना हक्काचे व्यासपीठ दिले होते. कधी एखाद्या चळवळीत भाग घेण्यास शेतकरी लोक धजावत नव्हते, त्या लोकांनी आपली शेती आणि समस्या मांडण्यात धन्यता मानून अधिवेशने मोठ्या संख्येने गाठली जाऊ लागली. ग्रामीण महिला व शेतकरी निजाम सत्तेच्या विरोधात जागृतीचे नवे पाऊले टाकत होती आणि निजाम सरकारला लोकजागृतीची जाणीव होण्यास वेळ लागला नव्हता. त्यामुळे दडपशाही धोरणे आणि अधिवेशनास भाषणाची परवानगी नाकारण्यासारखे कृत्य निजामी सत्तेकडून घडू लागले होते. शेतकरी अधिवेशनात भाग घेण्याची अनेक कारणे असली तरी शेतीची आणि शेतकऱ्याची आर्थिक दुर्दशा हे प्रमुख कारण मानले जाते.

1938 मध्ये लातूर अधिवेशनात शेतकरी लोक आणि त्यांची स्थिती कशी सुधारली जाऊ शकते यावर वारंवार चर्चा करण्यात येऊन शेतकरी वर्गाचे प्रश्न हाताळण्यात आले आणि त्यांच्यावर उपाययोजना देण्यात आली. शेतकऱ्याच्या शेतमालाला अधिक किंमत मिळावी, शेतकऱ्यासाठी उत्कृष्ट महसूल व्यवस्था निर्माण करावी इत्यादी मागण्या मांडण्यात आल्या.

परतूर या ठिकाणी झालेल्या शेतकरी आणि सामान्य लोकांच्या चर्चिलेल्या प्रश्नामुळे जागरूक झाले आणि लातूर येथे आयोजित अधिवेशनास सरकारकडून परवानगी घेण्याची अट घालण्यात आली होती. सरकारमार्फत कडक निर्बंध लादून परवानगी देण्यात आली. अध्यक्ष आणि इतरांची भाषणे कलेक्टरांना दाखविण्यात येऊन त्याला मंजुरी घेण्यात आली. या सर्व बाबी पाहता जाणवते की, सातवा निजाम मराठवाडा विभागात महाराष्ट्र परिषदेंमार्फत चाललेल्या जागृतीला थांबविण्याचा प्रयत्न करत होता. "1938 ला महाराष्ट्र परिषद ही जातीय संस्था आहे असे निजाम सरकारने जाहीर केले होते."[2]

शेतकरी कधी अधिवेशनांचे नियोजन क डिग्री शकला नसता; पण नेते देखील शेतकरी लोकांशिवाय अशी अधिवेशने घेऊ शकत नव्हते. कारण शेतकरी समाजाची संख्या अधिक होती. प्रस्तुत अधिवेशनासाठी अधिक शेतकरी यावे आणि लोकांची एकूणच संख्या अधिक असावी असा प्रयत्न केला होता. निजाम सरकार त्यांचे आधिकारी आणि जागीरदार यांना सन्मान देऊनच ही अधिवेशने घेणे भाग होते. महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात निजाम सरकार आणि त्यांच्या सलामतीबद्दल पार्थना करण्याची पध्दती आंमलात आणली गेली होती. "ही परिषद आपले परमपुज्य

व दयाळू बादशाह हिस एक्झॉक्टेड हायनेस आसफजहा निजाम-उल-मुल्क सी. जी. एस. आ. जी. बी यांचे विषयी आवर्ती आटळ राजनिष्ठा व्यक्त करते."[3]

### शेतसारा आणि लोकजागृती:

शेतसारा कमी करणे किंवा अधिकाऱ्याच्या कार्यपद्धतीतील अपेक्षित बदल मांडण्यात येत होते. त्यामुळे अशी अधिवेशने शेतकऱ्याच्या आस्थेचा आणि जिव्हाळयाचा विषय होता. सरकारने महाराष्ट्र परिषदेवर घातलेली बंधने म्हणजे शेतकऱ्याना एक प्रकारचा विरोध होता. त्यामुळे शेतकरी असंतोष वाढतच गेला होता. जनहक्कांची पायमल्ली करण्याचे धाडस निजामाला महागात पडत होते. दिवसेंदिवस लोकांचा सहभाग वाढत होता. एकूणच ग्रामीण भागात शेतकऱ्याच्या असणा–या समस्या मांडल्याने शेतकऱ्यात असंतोष निर्माण करून हैद्राबाद निजाममुक्त करण्याच्या चळवळीत शेतकऱ्याचे योगदान लाभले होते.

सेलू अधिवेशनात शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य भाव देण्यात यावा आणि कुळाना जमीनदारांकडून जाच होऊ नये याकरिता त्यांना संरक्षण देण्यात यावे यासंबंधी ठराव देखील मांडण्यात आला होता. "शेतकऱ्याना शोषणातून मुक्त करणे आणि शोषणरहित समाजाची निर्मीती करणे म्हणजे स्वातंत्र्य होय."[4] ही विचारप्रणाली मांडण्यात आली होती.

शेतकऱ्याना भाववाढीचा फायदा होणे आवश्यक आहे. पण दलालांना भाववाढीचा फायदा होत होता. त्याचप्रमाणे शेतकऱ्याकडून धान्यांच्या स्वरूपात घेण्यात येणा–या लेव्हीचे प्रमाण निश्चित नव्हते. त्यात मनमानी, घरातून धान्यांची विनापरवानगी तपासणी, अनन्वीत अत्याचार इत्यादी बाबी व्यवस्थित होण्याची आवश्यकता आहे अशी भूमिका मांडण्यात आली होती.

लातूर अधिवेशनात शेतकरी कुळांना संरक्षण देण्याच्या बाबींवर भर देण्यात आला होता. याशिवाय लेव्ही, सरंजामशाही शोषण या मुद्दयांवर देखील चर्चा करण्यात आली होती. शेतकऱ्यानी, महिलांनी, युवकांनी आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येण्याची व संघटनात्मक बांधणी करण्याची आवश्यकता या अधिवेशनात मांडण्यात आली होती

एकूणच महाराष्ट्र परिषदेने निजामाच्या अन्यायी आणि चुकीच्या धोरणावर टीका केली. जे लोक आपली शेती आणि तिची कामे सोडता कोणत्याही संघटनेचा भाग नव्हते अशा शेतकरी लोकांना एकत्रित करण्याचे अवघड कार्य या परिषदांच्या माध्यमातून साध्य करण्यात आले. शेतकऱ्याच्या शेतसाऱ्याचा, लेव्ही, जहागीरी आणि त्यात शेतकऱ्याची स्थिती इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्याच्या शेतमालास योग्य भाव मिळावा आणि दलांलामार्फत होणारे शोषण थांबविण्यात

यावे अशा अनेक महत्वपूर्ण प्रश्नांच्या मांडण्याने शेतकरी महाराष्ट्र परिषदेचा भाग बनला. महाराष्ट्र परिषदेची अधिवेशने आणि त्यात करण्यात आलेली भाषणे शेतकऱ्याच्या आंदोलनाची प्रेरणा होती. महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनासोबतच शेतकऱ्याचा मेळावा घेण्यात आलेला होता. त्यात आ. कृ. वाघमारे म्हणाले "उद्या तुमच्यातूनच साताऱ्च्या नाना पाटलांसारखी माणसे जन्माला येतील. तुमच्या मनगटात ताकद असेल व तुमच्या बंदुका ठासून भरलेल्या असतील तर तुम्हाला कोणाची भीती बाळगण्याचे कारण नाही."[5]

परिणामी शेतकऱ्याना निजामाच्या सत्तेची खरी ओळख होऊन तो विविध आंदोलनात सहभागी झाला. शेतकरी आपल्या हक्क आणि अधिकारांप्रति जागृत होऊन स्वातंत्र्याच्या मागणीसाठी संघटितपणे लढा देण्यास तयार झाला. निजामाच्या अन्यायी आणि जुलूमी अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी शेतकऱ्याचा समुह तयार झाला व कष्टकरी आणि शेतकरी लोकांनी जनआंदोलनात सहभाग घेतला.

## संदर्भग्रंथ सूची:


१. धारूरकर वि. ल., योद्धा कर्मयोगी, गोविंदभाई श्राफ. (प्रथमावृत्ती). औरंगाबाद: मराठवाडा जनता परिषद, १४६.

२. रोडे, अश्विनी सोमनाथ. (२०२२). हैद्राबाद मुक्तिसंग्रामात महाराष्ट्र परिषदेचे योगदान (प्रथमावृत्ती). लातूर: अरूणा प्रकाशन, पृ. क्र. ८४.

३. वि.गो. ब्रम्हनाथकर, हिंदु अस्मितेचा हुंकार, पृ. क्र. २९६.

४. उपरोक्त रोडे, अश्विनी, पृ. क्र. ९९.

५. देव, प्रभाकर. (१९९९). हैद्राबाद मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी (प्रथमावृत्ती). नांदेड: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, पृ. क्र. ९७.